उच्च व तंत्र शिक्षण विभाग व फ्रेंच दूतावास यांच्यातील सामंजस्य करार पूर्णत्वास नेण्यासाठी सुकाणू समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०१७/प्र.क्र. ४४६/१७/विशि-३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ०६ मार्च, २०१८.

प्रस्तावना :-

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य व फ्रेंच दूतावास यांच्यामध्ये दि. १३/०१/२०१८ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. सदरहू करार हा मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या उपस्थितीत श्री. सिध्दार्थ खरात, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व श्रीमती अरुणा ॲडीसेम, डेप्युटी कौन्सिल फॉर कॉर्पोरेशन ॲन्ड कल्चर यांच्यासमवेत पार पडला. सदरहू करारात नमूद केल्याप्रमाणे फ्रेंच दूतावास व उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्यामध्ये झालेल्या कराराचे मूल्यमापन व पर्यवेक्षण करण्याच्या दृष्टीने तसेच सदरहू प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी आणि यासंदर्भात विद्यार्थी हित लक्षात घेऊन, भविष्यात अधिक वाव निर्माण करण्याच्या दृष्टीने सुकाणू समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

फ्रेंच दूतावास व उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्यामध्ये झालेल्या कराराचे मूल्यमापन व पर्यवेक्षण करण्याच्या दृष्टीने तसेच सदरहू प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी आणि यासंदर्भात विद्यार्थी हित लक्षात घेऊन, भविष्यात अधिक वाव निर्माण करण्याच्या दृष्टीने शासन आता पुढीलप्रमाणे सुकाणू समिती गठीत करीत आहे.

अ. क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	पदनाम
१	डॉ. नितीन करमाळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे	अध्यक्ष
२	श्री. सिध्दार्थ खरात, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
३	डॉ. बी. एन. जगताप, शिक्षणतज्ञ, आयआयटी, पवई, मुंबई	सदस्य
४	डॉ. अपूर्वा पालकर, समन्वयक, उच्च शिक्षणाचे जागतिकीकरण	सदस्य
५	श्री. ख्रिस्तोफी लेग्रीज, फ्रेंच ॲटॅची ईन इंडिया	सदस्य
६	डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य सचिव

२. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

समिती राज्यातील विविध सार्वजनिक संस्थांमधील विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणाली निश्चित करेल.

३. या समितीच्या बैठका ज्या विद्यापीठात आयोजित केल्या जातील त्या विद्यापीठांनी समिती सदस्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०६११०३५४७७०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d95471 3c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2018.03.06 11:05:48 +05'30'

(सिध्दार्थ खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) डॉ. नितीन करमाळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२) श्री. सिध्दार्थ खरात, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३) डॉ. बी. एन. जगताप, शिक्षणतज्ञ, आयआयटी, पवई, मुंबई
४) डॉ. अपूर्वा पालकर, समन्वयक, उच्च शिक्षणाचे जागतिकीकरण
५) श्री. ख्रिस्तोफी लेग्रीज, फ्रेंच ॲटॅची ईन इंडिया
६) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
८) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१०) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२) मा. अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१३) निवडनस्ती.